**प्रतिवादीतर्फे अतिरिक्त सरतपास श्री. एस. आर. पोवार वकील यांचे मार्फत.**

**१९.** आता मला आमच्यामध्ये दि. ३०.०५.१९९० रोजी झालेले वाटणीपत्र दाखविले. त्यावरती माझी, वादीची आणि प्रतिवादी क्र. २ ची स्वाक्षरी आहे. त्यावरील साक्षीदार मंगल ही वादीची पत्नी आहे. वाटणीपत्रा वरती माझाी, वादी, प्रतिवादी क्र. २ आणि पंचांच्या स्वाक्ष–या असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. २५५** देण्यात येतो. (वादीतर्फे सदर दस्तास निशाणी क्रमांक देण्यास तो सिध्द झालेला नसल्यामुळे आक्षेप घेण्यात आलेला आहे. सदर साक्षीदार हा वाटणीपत्रात पक्षकार असून तो त्यावरील त्याची व इतरांची स्वाक्षरी ओळखत असल्यामुळे सदर दस्ताला केवळ ओळखीपुरती निशाणी देण्यात आलेली आहे.)

**सरतपास पुर्ण.**

**वादीतर्फे उलटतपास श्री. एस. एम. देशपांडे वकील यांचे मार्फत.**

**२०.** माझे अकरावी पर्यंतचे सन १९७८ साली शिक्षण झालेले आहे. मी उत्तूर व आजरा येथे शिक्षण घेतलेले आहे. माझे वडिल सार्वजनिक बांधकाम विभागात रोड मिस्त्री म्हणून काम करीत होते. त्यांचे दि. ०४.०२.१९७२ रोजी निधन झाले आहे. मी सर्व भावांत मोठा भाऊ असून आम्हाला तीन बहिणी आहेत. आमचे वडिल वारले तेव्हा आम्ही सर्व भाऊ–बहिण अविवाहित होतो. मी प्रतिवादी क्र. २ आणि मयत प्रतिवादी क्र. ३ साठी एकत्रीत लेखी म्हणणे दाखल केले आहे. मी आज रोजी प्रतिवादी क्र. २ साठी जबाब देत आहे.

**२१**. मी वडिलांच्या मृत्यूनंतर घरातील मोठा भाऊ या नात्याने सर्वांची लग्ने पार पाडली आहेत. दावा शेतजमिनी मृत्यूपर्यंत आमच्या वडिलांच्या नावे होत्या. आमच्या वडिलांच्या मृत्यूनंतर दावा शेतजमिनींना माझे कुटुंब प्रमुख म्हणून नाव लागले होते. त्याबाबतच्या फेरफार नोंद क्र. ९३ मध्ये माझ्या आई व बहिण आणि भावांच्या नावाचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

**२२**. मी शेतीव्यतिरिक्त इतर कोणताही व्यवसाय करत नाही. आमच्या वडिलांच्या नावे हालेवाडी येथे शेतजमिनी होत्या. मी वडिलांच्या निधना नंतर सर्व जमिनींचे व्यवहार आणि मिळणारे उत्पन्न पाहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, हालेवाडी येथील शेतजमिनीच्या उत्पन्नातून माझ्या नावे वडकशिवाले येथील गट नं. ३५४ ची जमीन दि. ०४.०६.१९८१

रोजी घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती जमीन माझ्या नावे एकत्र कुटुंबाचा कर्ता म्हणून घेतलेली आहे.

**२३**. हालेवाडी येथील घर मिळकत क्र. १७५ आजदेखील आमच्या वडिलांच्या नावे आहे. आमचे वडिल हयात असेपर्यंत याच घरात राहत होते. मी आज रोजी त्या घरात राहत आहे. त्या घरामागचे परडे देखील माझ्या ताब्यात आहे.

**२४**. ग्रामपंचायत मिळकत क्र. १२८, १२९, ७६/१ आणि ७६/२ या हालेवाडी येथील गट क्र. ४५४ मधील आहेत. साक्षीदार पुढे सांगतो, त्यातील मिळकत क्र. ७६ च्या पोटहिस्याची चुकीची नोंद घेण्यात आलेली आहे. त्या मिळकतीपैकी मिळकत क्र. ७६ ही घर मिळकत असून त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या मिळकत क्र. १२८ व १२९ मध्ये पोल्ट्री शेड आहे. मला मिळकत क्र. ७६ वरील घराचे आणि १२८ व १२९ वरील पोल्ट्री शेडचे बांधकाम कोणत्या वर्षी झाले याबाबत माहिती नाही.

**२५**. मला मिळकत क्र. ७६ आणि १२८ व १२९ वरील बांधकामाची लांबी–रुंदी माहिती नाही. मिळकत क्र. ७६ मधील घर दुमजली आहे, त्या घराच्या वरच्या मजल्या वरती दक्षिण बाजूला वादी राहतो. त्या मिळकतीच्या खालील बाजूस तळमजल्यामध्ये गोठा असून त्यामध्ये वादी त्याच्या गाई, म्हशी व शेळया बांधतो.

**२६**. मिळकत क्र. १२८ व १२९ वरील पोल्ट्री शेडमध्ये सन २००४–२००५ ते २०११–२०१२ पर्यंत वादी कुक्कुटपालनाचा व्यवसाय करीत होता. आज रोजी त्या दोन्ही शेडमध्ये सोयाबीनचा साठा केलेला आहे. मिळकत क्र. ७६, १२८ व १२९ या एकमेकांशी इंग्रजी सी आकारा प्रमाणे असून घर मिळकती समोर खुली जागा आहे. त्यानंतर काही जागा सोडून सुरक्षा भिंतीचे बांधकाम केलेले असून त्याला लोखंडी दरवाजा बसविलेला आहे. मी त्याचे फोटो दाखविल्यास ओळखू शकतो.

**२७**. आता मला मिळकत क्र. ७६, १२८ व १२९ वरील घर व शेडचे आणि सुरक्षा भिंत व लोखंडी दरवाजाचे फोटो दाखविले. ते बरोबर आहेत. साक्षीदाराने सदर फोटो मान्य केल्यामुळे त्यांना अनुक्रमे **नि. क्र. २५६ ते २५८** देण्यात येतात. हे म्हणणे खरे नाही की, घर क्र. ७६

समोरील परडयामध्ये वादी त्याच्या म्हशी बांधतो. घर मिळकतीच्या पश्चिमेला गट क्र. ४५४ मधील खुली जागा आहे. त्या खुल्या जागेमध्ये वादी जनावरांसाठी चारा साठवित असून म्हशी बांधत आहे. वादी त्या जागेमध्ये म्हशी बांधण्यासाठी उन्हाळयामध्ये कच्चा मांडव घालतो. मला त्याचे फोटो दाखविल्यास ओळखू शकतो. आता मला दाखविलेले फोटो उन्हाळयातील असून बरोबर आहेत. साक्षीदाराने सदर फोटो मान्य केल्यामुळे त्यांना अनुक्रमे **नि. क्र. २५९ व २६०** देण्यात येतात.

**२८**. दावा दाखल झाल्यापासून प्रतिवादी क्र. २ सुरक्षा भिंतीला असलेला लोखंडी दरवाजा बंद करुन वादीला येण्या-जाण्यास अडवित आहे. हा दावा दाखल करेपर्यंत वादी घरासमोरील गट क्र. ४५४ च्या मोकळया जागेत गवत कापत होता. या दाव्याच्या नोटीसा मिळाल्या नंतर मी व प्रतिवादी क्र. २ ने वादीला विरोध केलेला असून आज रोजी त्या जागेमध्ये मी स्वतः पिक घेत आहे.

**२९**. प्रतिवादी क्र. २ मुंबईला राहत असून त्याने पेंढारवाडी गाव हद्दीत जागा घेऊन घर बांधलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो मुंबईवरुन आल्यानंतर पेंढारवाडी येथील घरात राहतो.

**३०**. प्रतिवादी क्र. ३ पाच ते सहा वर्षांपुर्वी वारली आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती मृत्यू पर्यंत वादी व प्रतिवादी क्र. २ कडे सहा-सहा महिने राहत होती. ती प्रतिवादी क्र. २ सोबत मुंबईला राहत असताना वारली आहे.

**३१**. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४५४ मधील मिळकतीमध्ये एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून घराचे व शेडचे बांधकाम केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावरती वादीने जातीने हजर राहून अंगमेहनतीची कामे केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी गट क्र. ४५४ मध्ये प्रतिवादी क्र. २ ने स्वतंत्रपणे लोड बेअरींगच्या घराचे बांधकाम केल्याचे खोटे सांगत आहे. मी प्रतिवादी क्र. २ कडून त्याने केलेल्या बांधकामाची माहिती घेतलेली नाही.

**३२**. वाटणीपत्रावरील साक्षीदार विठ्ठल राऊ पाटील व लहू महादेव पन्हाळकर मुंबईला राहत होते. ते आज रोजी हयात नाहीत. प्रतिवादी क्र. २ मुंबईमध्ये दुर्गा क्रेडिट सोसायटी

चालवतो. हे म्हणणे खरे नाही की, लहू पन्हाळकर त्याच्याकडे दुर्गा क्रेडिट सोसायटीत कामाला होता. मला विठ्ठल पाटील दुर्गा सोसायटीचा संचालक असल्याचे माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते दोघे केवळ दिपावली व गणपती सणासाठी गावाकडे येत होते.

**३३**. आम्ही दि. ३०.०५.१९९० रोजी केलेल्या वाटणीपत्राप्रमाणे सर्व बहिणींच्या स्वाक्ष–या घेऊन आम्हा भावांच्या नावे जमिनींच्या वाटण्या केल्या होत्या. त्याप्रमाणे माझ्या नावे गट क्र. १०२, ४६२ आणि वडकशिवाले हद्दीतील गट क्र. ३५४ ची जमीन देण्यात आलेली आहे. प्रतिवादी क्र. २ च्या नावे गट क्र. ४५४ व ५२० ची जमीन आणि वादीच्या नावे गट क्र. १२२/अ, ब व क, ३० आणि ५२६ ची जमीन देण्यात आलेली आहे. आमच्यामध्ये वाटणी झालेल्या सर्व जमिनींचे एकूण क्षेत्र ५ एकर २८ गुंठे होते. त्यातील मला १ एकर ११ गुंठे, प्रतिवादी क्र. २ ला एकूण १२५ गुंठे अशी आणि वादीला एकूण ५६.५० गुंठे जमीन मिळालेली आहे.

**३४**. आम्ही दि. ३०.०५.१९९० रोजी शेतामध्ये दो–या टाकून प्रत्यक्ष मोजणी केली नव्हती. आम्ही वाटणी करण्याबाबत सकाळी ०८.०० वाजता चर्चा सुरु करुन दुपारी ०२.०० वाजता संपवली होती. आम्हाला वाटणीपत्र स्टॅंप पेपरवरती लिहिण्यास कोणतीही अडचण नव्हती. आम्ही केलेल्या वाटणी पत्रावरती बहिणींच्या स्वाक्ष–या घेतल्या नव्हत्या. आम्हाला बहिणींच्या स्वाक्ष–या घेण्यास कोणतीही अडचण नव्हती.

**प्रश्न** – तुम्हाला व प्रतिवादी क्र. २ ला तुमच्या पत्नींच्या सदर वाटणीपत्रा वरती स्वाक्षरी घेण्यास अडचण होती काय ?

**उत्तर** – आमच्या पत्नींची कोणतीही तक्रार नसल्यामुळे आम्ही त्यावरती त्यांच्या स्वाक्ष–या घेतल्या नव्हत्या.

हे म्हणणे खरे नाही की, आमच्यात दि. ३०.०५.१९९० रोजी कोणतेही वाटप झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र. १५५ वरती वादी व त्याच्या पत्नीच्या स्वाक्ष–या नाहीत.

**३५**. वाटण्या झाल्यानंतर दि. ३१.०५.१९९० रोजी त्याबाबतच्या नोंदी घेण्यासाठी तलाठी कार्यालयात अर्ज करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. फेरफार नोंद क्र. ४४८

घेण्यासाठी मी दि. ३०.०५.१९९५ रोजी गावातील चावडीत अर्ज केला होता. त्या अर्जावरुन सातबारा उता–यावरील सर्व धारकांना नोटीसा काढल्या होत्या. मी केलेल्या अर्जावरुन तहसिल कार्यालयात कोणतेही काम चालले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी व प्रतिवादी क्र. २ ने सन १९९५ सालच्या तलाठी व मंडळ अधिकारी यांना हाताशी धरुन खोटी फेरनोंद घातली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत नोटीस वादी व आमच्या बहिणींना मिळाल्या नव्हत्या.

**३६**. मी शपथपत्रात नमूद केलेल्या '*बामणाची मळवी*' या जमिनीचा गट क्र. २३७/अ व ब असून ती जमीन माझ्या नावावरती आहे. तिचे क्षेत्र २ एकर २८ गुंठे आहे. गट क्र. २३७/अ व ब, १२२/अ, ब व क, गट क्र. ३० व गट नं. १०२ पैकी काही क्षेत्र आंबेओहोळ मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रात संपादित झालेले आहे. त्यापैकी गट क्र. ३०, २३७/अ व ब आणि १०२ या जमिनी माझ्या नावावरती होत्या. शासनाने त्या जमिनीची रक्कम १४,४०,०००/– रुपये ठरवली होती. मी त्यापैकी ६५ टक्के रक्कम (०२,०५,०००/– रुपये) शासनाकडे जमा करुन बदली जमिनीची मागणी केली आहे. मला उर्वरित रकमेचे काय झाले याबाबत माहिती नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो, त्याने नुकसान भरपाईच्या रकमेची जमीन मागितली होती.

**३७**. मला गट क्र. १२२/अ, ब व क ची जमीन संपादित करुन शासनाने भरपाईची किती रक्कम मंजूर केली होती याबाबत माहिती नाही. आमच्या गावामध्ये माझ्या नावाचा मी एकमेव व्यक्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर जमिनीचे पैसे वादीला मिळू नये यासाठी उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ६, कोल्हापूर यांच्याकडे तक्रार अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी तक्रार दिल्यामुळे मला संबंधित विभागाने पुरावा सादर करण्यासाठी नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी संबंधित विभागाकडे न्यायालयाकडून पंधरा दिवसात मनाई आदेश मिळवून त्याची प्रत दाखल करीत असल्याचा जबाब दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेल्या तक्रार अर्जामुळे वादीला नुकसान भरपाईची रक्कम मिळालेली नाही.

**३८**. मी लेखी जबाब दाखल करण्यापूर्वी माझ्या वकिलांना संपुर्ण माहिती दिली होती.

**प्रश्न** – तुम्ही वादीने दाव्यात समाविष्ट न केलेल्या जमिनींचे गट क्रमांक तुमच्या

लेखी जबाब व शपथपत्रामध्ये का नमूद केलेले नाहीत ?

**उत्तर –** मला त्याचे कारण सांगता येणार नाही.

मी माझ्या लेखी जबाबात जमीनी स्वकष्टाने लेवल करुन गट क्र. ४६२ मध्ये बोअर मारल्याचे तसेच त्यामध्ये व गट क्र. १०२ मध्ये आंबा, नारळ व मेसकाठीचे झाडे लावल्याचा मजकूर लिहिलेला नाही. मी तो प्रथमच माझ्या शपथपत्रात सांगितला आहे.

**३९.** मला प्रतिवादी क्र. २ ने वादी व अन्य इसमांच्या विरोधात दाखल केलेल्या फौजदारी तक्रारी बाबत सांगितले असून त्याबाबतची ऐकीव माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मिळकत क्र. ७६/१ व २ च्या वादीने संगनमत करुन बोगस नोंदी घेतल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ ने ग्रामपंचायतीकडे अर्ज करुन मिळकत क्र. ७६/१ व २ च्या नोंदी घेतलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीने बोगस नोंदी घेण्या बाबतचे कोणतेही फौजदारी कृत्य केलेले नाही.

**४०.** हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे आम्हा बहिण–भावंडामध्ये वाटप झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजही दावा मिळकती आमच्या सामाईकपणे ताब्यात आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीला त्याचा हिस्सा मिळू नये यासाठी मी व प्रतिवादी क्र. २ ने संगनमत करुन खोटा लेखी जबाब दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने कोणत्याही जमिनीची विक्री केलेली नाही.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE
Date: 2024.07.02 17:37:20 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०२.०७.२०२४.

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.